अत्यंत महत्वाचे

कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कोरोना विषाणु प्रतिबंधक उपाययोजना करण्यासंदर्भात जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांची जबाबदार अधिकारी म्हणून नियुक्ती.

# पणन संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे


३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत,पुणे ४११००१

पीबीएक्स ०२०-२६१२६६२८/२६१२६७८५/२६११४०६४ फॅक्स ०२०-२६१२७००७/२६१३२४०१

Email :- dirmktms@gmail.com Web:- mahapanan.maharashtra.gov.in


जा.क्र.पणन-५/परिपत्रक/करोना/प्रतिबंधक- उपाययोजना/१०३०/२०२०

पुणे, दिनांक :- २७/०३/२०२०

## परिपत्रक

**संदर्भ : या कार्यालयाने कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठीच्या उपाययोजनांबाबत वेळोवेळी जारी केलेली सम क्रमांकाची परिपत्रके.**

कोविड–१९ (कोरोना विषाणू) याचा प्रसार रोखण्यासाठीच्या उपाययोजनांचा भाग म्हणून शासनाने संपूर्ण देशात १४ एप्रिल २०२० पर्यंत **लॉकडाऊन** करणेबाबत घोषणा केलेली आहे. शासनामार्फत त्याबाबतची अधिसूचना जारी करण्यात आलेली असुन नागरिकांना लागणाऱ्या अत्यावश्यक सेवा, उदा., बँक सेवा, औषधे, भाजीपाला, किराणा, दुध, इ. आवश्यक बाबींची दुकाने चालू ठेवण्यात येत आहेत.

लॉकडाऊनच्या काळामध्ये जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा व सेवा सुरु राहण्याच्या दृष्टीने पुरवठा साखळी व वाहतुक सुरु राहणार आहे. तथापि, कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक ती काळजी घेणे त्याचबरोबर सामाजिक विलगता राखणे (Social Distancing Measures) अत्यंत आवश्यक आहे. या बाबी विचारात घेऊन या कार्यालयाने उपरोक्त संदर्भीय परिपत्रकांन्वये तसेच विविध यंत्रणांद्वारे उचित दक्षता घेणेबाबत वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. तथापि अद्यापही बहुतांशी बाजार समित्यांमध्ये गर्दी होत असल्याचे दिसुन आल्याने ती नियंत्रीत करणे अत्यंत गरजेचे झालेले आहे. त्यामुळे बाजार आवारात येणाऱ्या व्यक्ती व बाजार घटक यांचेसंदर्भात करावयाची कार्यवाही पुढील १२ मुद्यांन्वये पुन्हा निदर्शनास आणुन देण्यात येत आहे.

१) बाजार समितीमध्ये येणाऱ्या व्यक्ती व बाजार घटकांचा प्रवेश नियंत्रीत करण्यासाठी ठराविक प्रवेश गेट निश्चित करुन त्यामधुनच त्यांना प्रवेश देण्यात यावा.

२) बाजार समितीमध्ये येणाऱ्या व्यक्ती तसेच बाजार घटकांचे थर्मल टेंपरेचर स्कॅनरद्वारे स्क्रिनिंग करण्यात यावे.

३) बाजार आवारात येणाऱ्या व्यक्तिंसाठी प्रवेशद्वाराजवळच हात निर्जंतुकीकरणासाठी सॅनिटायझर्सची व्यवस्था करण्यात यावी.

४) बाजार समितीमध्ये येणाऱ्या व्यक्ती व बाजार घटक यांचे चेहेऱ्यावर मास्क लावतील, याकडे बाजार समितीने जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

५) बाजार आवारात वावरणाऱ्या व्यक्ति किमान तीन फुट अंतरावर राहतील, याची दक्षता घ्यावी, यासाठी वारंवार उदघोषणाद्वारे व फलकांद्वारे आवाहन व अंमलबजावणी करावी.

६) बाजार आवारात असणाऱ्या स्वच्छतागृहांची स्वच्छता वारंवार करण्यात येऊन ते जास्तीत जास्त निर्जंतुक राहील, याची दक्षता घेण्यात यावी.

७) बाजार आवारामध्ये पुरेशा प्रमाणामध्ये हात स्वच्छ धुण्यासाठी साबण व पाण्याची व्यवस्था करावी.

८) बाजार आवारात असणाऱ्या कँन्टीनची व त्यामध्ये असणाऱ्या स्वयंपाकगृहाची वारंवार स्वच्छता करण्यात यावी.

९) बाजार आवारात उपस्थित असणाऱ्या व्यक्तिंनी खाद्यपदार्थ खाण्यापूर्वी हात स्वच्छ धुवावेत, यासाठी त्यांना प्रवृत्त करावे.

१०) बाजार आवारात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट तात्काळ लावण्यात यावी.

११) बाजार आवारात सार्वजनिक स्वच्छता राहील,यासाठी दररोज बाजार संपल्यानंतर सोयीची वेळ निश्चित करुन बाजार आवारात सोडियम हायपोक्लोराईड स्प्रेचा किंवा अन्य रसायनांचा वापर करावा. याबाबतच्या अधिक माहितीकरिता स्थानिक महानगरपालिका/नगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधावा

१२) कोरोना विषाणुसंबंधी जनजागृती होण्यासाठी बाजार क्षेत्रात लोकांना कोरोना विषाणूपासून काळजी घेणेबाबत फलक/उद्घोषणा याद्वारे आवाहन करावे व आवश्यक ती माहिती द्यावी.

**वरील सुचनांनुसार जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमार्फत अंमलबजावणी करुन बाजार समित्यांचे कामकाज सुरळीतपणे चालू राहील, हे पाहण्याची जबाबदारी संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांचेवर राहील याची नोंद घ्यावी. तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या बाजार समित्यांबाबतीत सदर जबाबदारी तालुका उपनिबंधक/सहाय्यक निबंधक यांचेकडे सोपविता येईल. तथापि, जिल्हयाच्या ठिकाणी किंवा मुंबईसारख्या मोठया कृषि उत्पन्न बाजार समितीची जबाबदारी संबंधीत जिल्हा उपनिबंधकांची राहील.** उपरोक्त नमूद १२ मुद्दे तातडीने जिल्हयातील सर्व बाजार समित्यांना अवगत करणे, सर्व संबंधीत घटकांना याची माहिती पटवुन देणे, यासाठी आवश्यक असलेले साहित्य, औषधे, रसायने, केमिकल्स, यांची उपलब्धता करुन देण्यासाठी बाजार समित्यांना मार्गदर्शन करणे, तसेच पोलीस, महसूल व इतर यंत्रणांशी जिल्हा उपनिबंधक यांनी स्वत: समन्वय साधणे, या बाबी जिल्हा उपनिबंधक यांनी आवर्जुन करावयाच्या आहेत. तसेच कोणत्याही परिस्थितीत वरील सूचनांचे पालन होण्यास कुचराई होणार नाही, याची जिल्हा उपनिबंधक यांनी दक्षता घ्यावी.

**उपरोक्त सर्व कामकाजामध्ये समन्वय रहावा म्हणून सदर कामकाजासाठी संबंधीत विभागाचे विभागीय सहनिबंधक यांना " समन्वय अधिकारी " म्हणून नियुक्त करण्यात येत** आहे. त्यांनी त्यांच्या विभागातील बाजार समित्यांसंदर्भात वरील सर्व सूचनांची अंमलबजावणी गांभीर्याने होईल, याची दक्षता घेऊन कामकाज करावयाचे आहे.

(सुनिल पवार)
पणन संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. सभापती/सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)

प्रत माहितीस्तव सस्नेह :

१) मा.विभागीय आयुक्त (सर्व)
२) मा.जिल्हाधिकारी (सर्व)

३) मा.जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)
४) मा.आयुक्त, म.न.पा. (सर्व)/नगर परिषदा (सर्व)
५) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ,पुणे
६) मा.मंत्री,सहकार व पणन यांचे खाजगी सचिव
७) मा.राज्यमंत्री,पणन यांचे खाजगी सचिव

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

१) मा.प्रधान सचिव (पणन), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई-३२
२) मा.सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे